# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 05/03/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

### कुख्यात गुन्हेगार जयसिंग यादव याला ठोकल्या बेडया
### (स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीस पथकाची कार्यवाही)

स्था.गु.शा. :- दि. 05/03/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथे गोपनिय बातमीदाराने खात्रीशिर माहिती दिली की, पोलीस स्टेशन कन्हान येथे दाखल गुन्हयातील पाहीजे असलेला आरोपी जयसिंग यादव हा आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स्, नागपूर येथे एका चहाच्या टपरीवर चहा पिण्याकरीता थांबलेला आहे व त्याने पांढरा रंगाचा हाफ बाहीचा शर्ट व काळया रंगाची फुलपॅन्ट परिधान केलेली आहे. प्राप्त खबरेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांनी तातडीने पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते यांचे पथकास कुख्यात जयसिंग यादव याला ताब्यात घेण्याकरीता रवाना केले. स्था.गु.शा. येथील पथकाने अतिशय शिताफीने आकाशवाणी चौक येथील चहाच्या टपरीवर सापळा रचून कुख्यात गुन्हेगार जयसिंग असरफिलाल यादव, वय 39 वर्ष, रा. चोरबाहुली तह. रामटेक जि. नागपूर याला ताब्यात घेतले. कुख्यात जयसिंग यादव याचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची हकिकत अश्याप्रकारे आहे की, दि. 08 एप्रिल 2013 मध्ये कन्हान येथील नाका नंबर 7 जवळ कुख्यात गुन्हेगार मोनिश रेड्डी याचेवर त्याचे परस्परविरोधी टोळीतील काही कुख्यात गुन्हेगारांनी देशी पिस्तूलाने गोळीबार करुन त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेची कन्हान पोलीसांकडून दखल घेवून कुख्यात गुन्हेगार 1) योगेश यादव, 2) राजा यादव, 3) विपीन गोंडाने, 4) जयसिंग यादव, 5) उमेश भोयर, 6) जिवन ठवकर आणि 7) प्रशांत येलेकर यांचेविरुध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे गुन्हा रजि.नं. 22/2013 कलम 307, 143,147,148,149,109 भादवि सहकलम 3, 25 आर्म ॲक्ट अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली होती. जयसिंग यादव आणि मोनिश रेड्डी यांनी आपआपली स्वतंत्र टोळया तयार केल्या होत्या त्यामुळे त्यांचेमध्ये अवैध धंदयांचे जुने वैमनस्यामधून टोळी युध्द सुरु होते. जयसिंग यादव व्यतिरीक्त यातील सर्व आरोपीतांना त्यावेळी गुन्हयात अटक करण्यात आली होती. परंतू कुख्यात जयसिंग यादव याल कायदयाच्या कचाटयातून पळ काढण्याचा मार्ग चांगलाच ठाऊक होता. त्याने त्याकालावधीत मा. उच्च न्यायालय, खंडपिठ नागपूर येथुन तात्पुरता अंतरिम जामीन मिळविला होता. परंतू त्याने पोलीसांना तपासात कुठलेही सहकार्य केले नाही व तो पोलीसांसमोर हजर झाला नाही, त्यामुळे त्याचा अंतरिम जामीन मा. उच्च न्यायालयाने खारीज केला होता. सदर बाब जयसिंग याला माहिती पडताच तो फरार झाला होता. तेव्हापासून कन्हान पोलीस सतत त्याच्या शोधात होते. परंतू कुख्यात जयसिंग यादव हा सुमारे 8 वर्षापासून कन्हान पोलीसांना गुंगारा देत राहीला. अखेर नगापूर ग्रामीणचे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुमारे 8 वर्षानंतर त्याच्या मुसक्या आवळून त्यास बेडया ठोकल्या व पोलीस स्टेशन कन्हान यांचे स्वाधिन केले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार पोलीस उपनिरीक्षक सचिन मत्ते, पोलीस हवालदार नाना राऊत, पोलीस नायक दिनेश आधापूरे, पोलीस शिपाई अमोल वाघ, विपीन गायधने, प्रयण बनाफर, महिला पोलीस नायक नम्रता बघेल आणि चालक सहा.फौजदार साहेबराव बहाळे पोलीस नायक अमोल कुथे यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर